# गँगरीन

## गँगरीन म्हणजे काय?

गँगरीन म्हणजे जंतुसंसर्गामुळे किंवा दुखापतीमुळे होणारा उतींचा कायमस्वरुपी -हास (रक्तप्रवाह खंडित झाल्यामुळे किंवा जीवाणू संसर्गामुळे उतींचा मृत्यु होतो )

रक्ताची गुठळी झाल्यामुळे किंवा रक्तवाहिन्या आकुंचित झाल्यामुळे उतींमधील रक्तप्रवाह खंडित होतो. उतीला चिरा पडल्याने किंवा जखम झाल्याने त्यातून जंतुसंसर्ग होतो, जसे भाजल्याच्या जखमा, बंदुकीच्या गोळीच्या जखमा किंवा व्रण गँगरीनचा परिणाम सर्वसाधारणपणे हात बोटे, संपूर्ण हात, पायाचे अंगठे, संपूर्ण पाय याठिकाणी होतो. गँगरीनमुळे मृत्यु संभवतो त्यामुळे त्यावर त्वरीत उपचार होणे आवश्यक आहे .

## गँगरीन होण्याचा धोका कशामुळे वाढतो

- मधुमेह
- हृदयाबाहेरील धमन्यांचे आजार
- रक्तात सहज गुठळी होईल अशी परिस्थिती
- प्रतिकारशक्ती कमी होईल अशी परिस्थिती जसे HIV
- थंडीमुळे होणा-या जखमा
- शीरेतून घेतली जाणारी नशाकारके
- कर्करोग

## गँगरीनच्या खुणा आणि लक्षणे काय आहेत ?

गँगरीनची सुरुवात ताप, वेदना आणि सुज यांपासुन होते. वेदना आणि सूज वेगाने वाढतात मृत पेशी/उतींचा भाग तपकीरी लाल जांभळा किंवा काळा दिसतो. त्यामधून लाल किंवा पिवळया रंगाचा दुर्गंधीयुक्त स्त्राव निघतो.

## गँगरीनचे निदान आणि उपचार कसे करतात?

प्रभावित भागाचे तपासणी केल्यावर डॉक्टर त्या उतींचा नमुना तपसणीसाठी घेतात. अतिशय गंभीर परिस्थिती असल्यास हात/पायाचा बाधित भाग पुर्णपणे काढून टाकला जातो. रुग्णाला संसर्ग बरा होण्यासाठी प्रतिजैविके दिली जातात. इतर औषधे वेदना आणि ताप कमी करण्यासाठी दिली जातात. ज्यामुळे रक्तपुरवठा कमी पडतो अशा परिस्थितीवरही उपचार केले जातात. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला प्राणवायूचा पुरवठा करण्यासाठी हायपरबॅरीक ऑक्सीजन थेरपी(HBO) दिली जाते. HBO मुळे रक्तपुरवठा वाढतो आणि संसर्गाचे दुष्परिणाम कमी होण्यास मदत मिळते. शरीराच्या इतर भागातही संसर्ग पोहोचला असल्यास इतर उपचारांची गरज लागू शकते.

## गँगरीन आपण कशाप्रकारे टाळू शकतो?

- सर्व प्रकारच्या जखमा आणि चिरांची काळजी घेणे - जखम अथवा चिरांना स्पर्श करण्यापूर्वी आणि नंतर हात स्वच्छ धुवावेत . जखमा किंवा चिरा वेळोवेळी साबण पाण्याने स्वच्छ धुवाव्या कोरडे करुन बँडेज करावे. बँडेज ओले झाल्यास अथवा खराब झाल्यास बदलावे.
- इतर आरोग्य समस्यांचे व्यवस्थापन करावे - मधुमेह, हृदयासबाहेरील धमन्यांचे आजार आणि रक्ताची गुठळी होण्याच्या समस्या यांचे व्यवस्थापन करावे. या परिस्थितीत जखमांमध्ये संसंर्ग होण्याची शक्यता वाढते.
- रक्ताची गुठळी होणे किंवा अपुरा रक्तपुरवठा या स्थितीत तत्काळ उपचार घ्यावे -रक्ताची गुठळी झाल्याची लक्षणे म्हणजे हात किंवा पाय गरम लागणे ठुसठुसणे आणिं वेदना त्याव सूज आणि लाली दिसते. रक्तपुरवठा कमी असण्याची लक्षणे म्हणजे हात किंवा पाय थंड पडणे , पांढरे फटक पडणे किंवा बधिरता येणे.

**संदर्भ: मायक्रोमेडेक्स केअर नोटस सिस्टिम ऑनलाईन 2.0**